॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


✲ सुविचार ✲

शत्रूने केलेले कौतुक
हीच आपली सर्वोत्तम कीर्ती होय.


आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट

'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर

आपल्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअरमध्ये जावून veerbhumi ॲप डाउनलोड करा. आणि तेथे वाचा एक महिन्याचे वीरभूमी पेपर व ताज्या बातम्या एका क्लिकवर तेही अगदी मोफत.

आता आपल्यासाठीच veerbhumi ॲप

आता बातमीबरोबरच बरेच काही

मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi



■ अहिल्यानगर ■ बुधवार, दि. ८ जानेवारी २०२५ ■ वर्ष ५ वे ■ अंक २८० वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## SPOT NEWS

### राज्यात पुढील तीन दिवस थंडीचा कडाका

● **पुणे** – सध्या राज्यामध्ये पुढील तीन दिवस थंडीचे राहणार आहेत. शुक्रवार दि. १० जानेवारी पर्यंत माफक थंडीचा अनुभव मुंबईसह संपूर्ण कोकण व महाराष्ट्रात जाणवेल. मंगळवार दि. ७ जानेवारी मुंबईसह कोकणात पहाटेचे किमान तापमान सरासरीच्या खाली घसरले आहे. मुंबई सांताक्रूझ येथे तर किमान तापमान सरासरीच्या २ डिग्री खालावून १५.२ डिग्री सेल्सिअस ग्रेड होते, अशी माहिती सेवानिवृत्त हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली. राज्यामध्ये गेल्या दोन दिवसांमध्ये किमान तापमान किंचित वाढले होते. त्यामुळे किमान तापमानाचा पारा १० अंशावर गेला होता. मंगळवारी राज्यात केवळ जळगाव येथे पारा १० अंशाच्या खाली ८.८ वर नोंदवला गेला. इतर ठिकाणी १० अंशाच्या वर पारा नोंदविला गेला. पुढील तीन दिवस थंडीत वाढ होण्याची शक्यता आहे. शनिवार दि. ११ जानेवारी पासून मात्र मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात पुन्हा थंडीचा प्रभाव काहीसा कमी होईल, तर मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात कदाचित काहीसे ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे असेही खुळे यांनी सांगितले.

### आमदार धस यांनी घेतली उपमुख्यमंत्री पवारांची भेट

● **बीड** – मुंबई : बीड जिल्ह्यातील भाजप आमदार सुरेश धस यांनी आज राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि पवनचक्की खंडणी प्रकरणावरून आमदार धस यांच्याकडून वारंवार राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांना लक्ष्य करण्यात येत आहे. तसंच मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मुद्यावरून धस यांनी जाहीर भाषणातून अजित पवारांनी लक्ष्य केले होते. या पार्श्वभूमीवर सुरेश धस यांनी घेतलेली अजित पवारांची भेट महत्त्वाची मानली जात आहे. बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात विविध पतसंस्थांमध्ये मोठा घोटाळा झाला आहे. बीड जिल्ह्यातील सव्वालाख आणि मराठवाड्यातील एकूण १६ लाख ठेवीदारांचे पैसे बुडाले आहेत. या लोकांना मदत मिळवून देण्यासाठी केंद्रासोबत बोलावे, यासाठी मी अजित पवारांची भेट घेतली असल्याचे सांगितले.

# मायक्रोसॉफ्ट भारतात गुंतवणूक करणार

## सत्या नडेला यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट

● **नवी दिल्ली । वीरभूमी –** मायक्रोसॉफ्ट कंपनीचे भारतीय वंशाचे सीईओ सत्या नडेला यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मायक्रोसॉफ्ट भारतात तीन अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार असल्याची घोषणाही केली. तसेच १ कोटी तरुणांना एआयसाठी प्रशिक्षित करणार असल्याचेही ते म्हणाले. बजेटपूर्वीच मोठ्या गुंतवणुकीची घोषणा झाल्याने बाजारात आनंदाची उसळी येण्याची शक्यता आहे.

नवी दिल्लीत नडेला यांनी मोदींची भेट घेतली. यावेळी त्यांनी कंपनीच्या विस्तार आणि गुंतवणुकीबाबत माहिती दिली. यामध्ये एआय, क्लाऊड सर्व्हिसपासून ते विविध अविष्कारांचा समावेश आहे. सोमवारी ही भेट झाली. याची माहिती नडेला यांनी एक्सवर दिली आहे. नडेला यांनी आज याची माहिती देत भारतात मायक्रोसॉफ्ट तीन अब्ज डॉलर्स एवढी प्रचंड गुंतवणूक करणार असल्याचीही घोषणा केली. मायक्रोसॉफ्ट २०३० पर्यंत भारतातील सुमारे १ कोटी लोकांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणार असल्याचेही ते म्हणाले.



# 'एचएमपीव्ही' व्हायरसमुळे प्रशासन अलर्ट मोडवर

● **मुंबई । वीरभूमी–** चीनमध्ये 'एचएमपीव्ही' या नव्या व्हायरसने शिरकाव केल्याने जगभरातील देशांची धाकधूक वाढवली आहे. सोमवारी बंगळूरू आणि गुजरातमध्ये या व्हायरसचे रुग्ण आढळल्याने खळबळ उडाली होती. या पाठोपाठ नागपूरमध्ये देखील एचएमपीव्हीची लागण झालेले दोन रुग्ण आढळून आले आहेत.

कोरोना महामारीचा एकदा चटका बसल्याने आता प्रशासन अलर्टमोडवर आले आहे. महाराष्ट्रासह मराठवाड्यात शासकीय जिल्हा रुग्णालयांमध्ये बेडच्या संख्या राखीव ठेवण्यात येत आहे. तर खबरदारी म्हणून औषधांचा साठा तयार ठेवण्यात येत आहे. एचएमपीव्ही रोगाच्या पार्श्वभूमीवर हिंगोली आरोग्य विभाग अलर्टमोडवर आला असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत. जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये २५ बेड आयसीयू तर ५० जनरल बेड आरक्षित करण्यात आले आहेत. तशी व्यवस्था जिल्हा सामान्य रुग्णालयात करण्यात आली असून या रोगाच्या बातमीवर तपासण्या करण्याच्या सूचनाही सर्व डॉक्टरांना दिल्या आहेत.

राज्य शासनाने वैद्यकीय मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली असून सर्व शासकीय रुग्णालयांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, शासकीय रुग्णालये आणि महाविद्यालयांत यंत्रणा तातडीने कामाला लागली आहे. रुग्णालयांमध्ये किमान तीन महिने पुरेल इतका औषधांचा साठा ठेवण्यात आला आहे.

# राज्यात एक एप्रिलपासून सर्व वाहनांना फास्टटॅग बंधनकारक

● **मुंबई । वीरभूमी–** राज्यातील सर्व वाहनांसाठी एक एप्रिल २०२५ पासून, फास्ट टॅग बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे एक एप्रिलपासून या निर्णयाची राज्यात सर्वत्र अंमलबजावणी होणार आहे. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महायुती सरकारने हा महत्त्वाचा निर्णय घेतला. दरम्यान सरकारच्या या निर्णयावर वाहनधारकांमधून काय प्रतिक्रिया येणार आणि याचा टोल नाके आणि वाहतूक कोंडीवर कसा परिणाम होणार हे पाहावे लागणार आहे.





केंद्र सरकारने सर्व चारचाकी वाहनांसाठी १ जानेवारी २०२१ पासून 'फास्ट टॅग' अनिवार्य केले होते. सरकारच्या रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने या संदर्भात एक परिपत्रक काढत, १ जानेवारी २०२१ पासून सर्वचार चाकी वाहनांसाठी फास्ट टॅग अनिवार्य करण्यात आल्याचा निर्णय जाहीर केला होता. विशेष म्हणजे हा नियम जुन्या म्हणजेच ज्यांची विक्री १ डिसेंबर २०१७ च्या अगोदर झालेल्या वाहनांसाह एम व एन कॅटेगिरीतील वाहनांना देखील लागू करण्यात आला होता. पण याची अनेक राज्यात पूर्णपणे अंमलबजावणी अद्याप झालेली नाही.

केंद्रीय मोटार मोटार वाहन नियम १९८९ नुसार १ डिसेंबर २०१७ नंतर खरेदी करण्यात आलेल्या सर्व चारचाकी वाहनांच्या रजिस्ट्रेशनसाठी ङ्गफास्ट टॅगफ अनिवार्य केले गेले होते. वाहन निर्माता किंवा डीलरद्वारे 'फास्ट टॅग'चा पुरवठा केला जात होता. तसेच 'फास्ट टॅग' लावलेल्या वाहनांचेच फिटनेस प्रमाणपत्राचे रिन्युअल केवळ करण्याचा आदेश दिला होता. दरम्यान नॅशनल परमीट वाहनांसाठी १ ऑक्टोबर २०१९ पासूनच 'फास्ट टॅग' बंधनकारक करण्यात आले होते.

# दिल्ली विधानसभेची निवडणूक जाहीर

## ५ फेब्रुवारीला मतदान तर ८ फेब्रुवारीला निकाल

● **नवी दिल्ली । वीरभूमी–** दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली असून दिल्लीत ५ फेब्रुवारीला मतदान होणार आहे तर ८ फेब्रुवारीला निकाल लागणार आहे. यावेळीही दिल्लीची निवडणूक एकाच टप्प्यात पूर्ण होणार आहे. विधानसभेच्या सर्व ७० जागांसाठी एकाच दिवशी मतदान होणार आहे. निवडणूक काळात आम्ही बोलू शकत नाही असे सांगत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी ईव्हीएम बाबतच्या सर्व आरोप, तक्रारी या खोट्या असल्याचे सांगितले.



ईव्हीएमशी छेडछाड करण्याच्या चर्चेला काही फायदा नाही. ईव्हीएम हॅक करता येत नाही, हे न्यायालयाने मान्य केले आहे. मात्र ईव्हीएमवर संशय निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. निवडणुकीच्या सात-आठ दिवस आधी ईव्हीएम तयार असतात. एजंटसमोर ईव्हीएम सील केले जाते. मतदानानंतर ईव्हीएम सील केले जातात. ईव्हीएममध्ये अवैध मतांची शक्यता नाही. ईव्हीएमची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आहे असे कुमार म्हणाले. दिल्लीची ही ईव्हीएम निवडणूक असल्याचे सांगण्यात आले. मतदार यादीतून नावे वगळल्याची तक्रार करण्यात आली आहे. मतमोजणी संथगतीने होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवडणूक आयोगावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रश्नांची उत्तरे देणे ही आपली जबाबदारी आहे. पारदर्शकता ही आमची प्राथमिकता आहे. मतदार यादीत चुकीच्या नोंदी केल्याचे आरोप ऐकून मन दुखावते, असे राजीव कुमार म्हणाले.

मतदान संपण्यापूर्वी मतदान अधिकाऱ्यांना अनेक गोष्टी कराव्या लागतात. त्यामुळे अंतिम मतदानाच्या टक्केवारीशी संध्याकाळी ५ वाजताच्या आकड्यांची तुलना करणे योग्य नाही. मतदान संपल्यानंतर, प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदान प्रतिनिधींना फॉर्म १७ सी दिला जातो. या फॉर्ममध्ये त्या मतदान केंद्रावर झालेल्या मतदानाची नोंद असते, असेही त्यांनी स्पष्ट केले. महिलांबद्दल असभ्य भाषा वापरू नका. निवडणूक प्रचारात भाषेची काळजी घ्या, असा सल्लाही त्यांनी राजकीय पक्षांना, नेत्यांना दिला.

# सिंचन व्यवस्था बळकटीकरीता अन्य राज्यातील सिंचन व्यवस्थेचा अभ्यास करावा

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जलसंपदा विभागाला सूचना

● **लोणी । वीरभूमी–** राज्यातील सिंचन व्यवस्था अधिक बळकट होण्यासाठी राज्यातील सिंचन व्यवस्था व अन्य राज्यातील सिंचन व्यवस्थेचा तुलनात्मक अभ्यास करावा. याचा राज्यातील सिंचन क्षमता वाढविण्यास मदत होईल. या अनुषंगाने जलसंपदा विभागाने कार्यवाही करावी, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री श्री. विखे पाटील यांनी आज सह्याद्री अतिथी गृह येथे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडील कामांचा आढावा घेतला. यावेळी जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, लाभक्षेत्र विकास सचिव संजय बेलसरे, कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, मुख्य अभियंता तथा सह सचिव सर्वश्री अभय पाठक, संजीव टाटू, अभियंता प्रसाद नार्वेकर यांच्यासह गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री विखे पाटील म्हणाले, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळामार्फत सुरू असलेल्या सिंचनाच्या कामांना गती देऊन प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी कृती आराखडा तयार करावा. बांधकामाधीन प्रकल्पाची कामे जलदगतीने दर्जेदार व गुणवत्तापूर्ण करावीत. राज्यातील सिंचन क्षेत्र वाढल्यास त्याचा शेतकऱ्यांना फायदा होऊन त्यांची आर्थिक उन्नती होण्यास मदत होईल. सिंचन प्रकल्पांच्या नवीन कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता लवकर मिळाव्यात. त्यासाठीचे प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावरून तातडीने पाठवावेत. सिंचन प्रकल्पाची कामे लवकर सुरू होण्यासाठी आवश्यक परवानग्या मिळवण्यासाठी पाठपुरावा करावा.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि बळीराजा जलसंजिवनी योजनेत समाविष्ट कामे विहित मुदतीत पूर्ण झाली पाहिजेत, अशा सूचना देऊन जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले की, १०० दिवसाच्या कालावधीत घेण्यात येणाऱ्या कामांचे सुयोग्य नियोजन करावे. जलसंपदा विभागाच्या योजनांसाठी आवश्यक निधी मुदतीत मिळण्यासाठी अर्थ विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत लवकरच बैठक घेतली जाईल.

वॉटर अकांऊट बाबत जागरूकता निर्माण झाली पाहिजे. धरणातील पाणी, धरणातून सोडलेले पाणी, सोडलेल्या पाण्याचा झालेला वापर, आकारलेली व वसूल झालेली पाणीपट्टी याबाबत जलसंपदा विभागाने सुयोग्य नियोजन करावे, अशा सूचना जलसंपदा मंत्र्यांनी बैठकीत दिल्या.

या बैठकीत गोदावरी खोरे महामंडळांतर्गत येणाऱ्या १०० दिवसांमध्ये ज्या प्रकल्पांचे भूमिपूजन अथवा उद्घाटन करणे शक्य असेल



अशा प्रकल्पांचा आढावा, प्रकल्पांमध्ये असणारा पाणीसाठा व सिंचनाची सद्यःस्थिती, नदीजोड प्रकल्पाची सद्यःस्थिती, सुरु असणारे प्रकल्प अथवा प्रकल्प घटकांच्या कामांची सद्यःस्थिती, मंजूर प्रकल्पांची सद्यःस्थिती, उपसा जलसिंचन योजना व महत्वाच्या प्रकल्पांची सद्यःस्थिती. यामध्ये प्रामुख्याने साईगंगा उपसा जलसिंचन योजनेचे हस्तांतरण व अंमलबजावणी, साकूर, ता. संगमनेर येथील प्रस्तावित उपसा जलसिंचन योजना, वांबोरी पाईप चारी टप्पा-१ दुरुस्ती/ टप्पा-२, भोजापूर, ता. संगमनेर येथील जलसिंचन योजना, सहकारी तत्वावर असलेल्या उपसा जलसिंचन योजनांचे तापी जलसिंचन योजनेच्या धर्तीवर नुतनीकरण करणेबाबतचे सादरीकरण, जायकवाडी प्रकल्पाची सद्यःस्थिती (पर्यटन विकास, न्यायालयीन बाबी / अहवाल), करावयाच्या नाविन्यपूर्ण योजनांचा आढावा घेण्यात आला.

SPOT NEWS



## नगरच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना निमंत्रण

**● नगर । वीरभूमी-**

अहिल्यानगर शहरात महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर संघाच्या वतीने होणाऱ्या ''वरिष्ठ गट राज्यस्तरीय गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत २०२४-२५'' ही स्पर्धा येत्या २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीमध्ये वाडीया पार्क मैदानावर होणार आहेत. या स्पर्धेतील महाराष्ट्र केसरीच्या अंतिम लढतीतील विजेत्या कुस्तीगीरास मानाची गदा प्रदान करण्यासाठीचे निमंत्रण व विनंती पत्र स्पर्धेचे संयोजन व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष आ.संग्राम जगताप यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत सोमवारी भेट घेऊन दिले. यावेळी केंद्रीय राज्य मंत्री व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष पै. मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै. संदीप भोंडवे, सरचिटणीस हिंद केसरी पै. योगेश दोडके व राज्य कुस्तिगीर संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. वरिष्ठ राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी स्पर्धाचे यजमानपद अहिल्यानगर शहराला मिळाले असून आयोजनाची जबाबदारी अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघास मिळालेली आहे. अंतिम लढतीस राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहून कुस्तीगीरांना प्रोत्साहन द्यावे अशी इच्छा महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाची, जिल्हा कुस्तीगीर संघाची व राज्यातील तमाम कुस्तीप्रेमींची असल्याचे आ.जगताप यांनी यावेळी सांगितले.

## अहिल्यानगरच्या यश सोमानीचे राष्ट्रीय युवा महोत्सवात सुयश

**● नगर । वीरभूमी-**

मूळचा नगरचा व पुणे येथील अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठातील बी.टेक. कॉम्प्युटर सायन्सच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेला व राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी यश योगेश सोमानी याने भारत सरकारच्या युवक व क्रीडा मंत्रालयातर्फे आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सवात आपल्या कामगिरीने मोठे सुयश प्राप्त केले आहे. विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२४ अंतर्गत स्पर्धा घेण्यात आली. यात पहिल्या दोन टप्प्यातील प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धेत यश मिळवत त्याने तिसरा टप्पा गाठला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय उत्तराखंड यांच्यातर्फे डेहराडून येथील दून विश्व विद्यापीठात झालेल्या राज्यस्तरीय विकसित भारत पीपीटी आव्हाने स्पर्धेत त्याने तिसरा टप्पाही पार केला. त्याला आता दिल्लीत दि.९ ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील युवा महोत्सवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर विकास भी, विरासत भी या विषयावर सादरीकरण करण्याची संधी मिळाली आहे. तो दून विश्वविद्यापीठाचा टिम लिडर म्हणून प्रतिनिधीत्व करणार आहे. अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ. राकेशकुमार जैन आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयोजिका प्रा.शितल सोलंकी यांनी यशचा सत्कार करून अभिनंदन केले. यश सोमानी हा नगरमधील महेश्वर प्रिंटर्सचे संचालक योगेश व ज्योती सोमानी यांचा मुलगा आहे. त्याचे शालेय शिक्षण नगरमध्येच सेक्रेट हार्ट हायस्कूलमध्ये झालेले आहे. आपल्या उत्तुंग कामगिरीमुळे त्याला थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर विचार सादर करण्याची संधी मिळाल्याने त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# शिक्षणाच्या आवश्यक भौतिक सुविधासाठी कटिबद्ध

### आ. आशुतोष काळे । संवत्सर येथे कोपरगाव तालुका विज्ञान-गणित प्रदर्शनाचे उद्घाटन

**● कोपरगाव । वीरभूमी-**

विज्ञानाच्या सहाय्याने आपण जगातल्या कुठल्याही संकटावर मात करू शकतो व विज्ञान आणि गणित यांच्या मदतीने आपण यशाला गवसणी घालू शकतो. विज्ञान आणि गणित आपल्या सर्वांच्या समृद्ध आणि प्रगतीशील भविष्यासाठी आवश्यक आहेत. विज्ञान-गणित व पर्यावरण प्रदर्शनाच्या माध्यमातून नवनवीन बाल वैज्ञानिक घडले पाहिजे. त्यासाठी शिक्षण क्षेत्राला आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही आ.आशुतोष काळे यांनी दिली.

कोपरगाव तालुक्यातील संवत्सर येथील रयत शिक्षण संस्थेच्या जनता इंग्लिश स्कूल मध्ये पंचायत समिती कोपरगाव आणि विज्ञान, गणित अध्यापक संघ आयोजित ५२ वे कोपरगाव तालुका विज्ञान-गणित व पर्यावरण प्रदर्शन सन २०२४-२५ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जि. प. सदस्य राजेश परजणे होते. याप्रसंगी तहसीलदार महेश सावंत, कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचे संचालक दिलीपराव बोरणारे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती गोवर्धन परजणे, सामाजिक कार्यकर्ते संजयराव काळे, शालेय व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष मधुकर साबळे, सरपंच सुलोचना ढेपले, उपसरपंच विवेक परजणे आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी पुढे बोलतांना आ.आशुतोष काळे म्हणाले की, प्रत्येक क्षेत्रात असलेले विज्ञान आणि गणिताचे महत्त्व नाकारता येणार नाही. विविध क्षेत्रातील नवनवीन शोधांमुळे आपले जीवन अधिक सुलभ आणि समृद्ध बनले आहे. विविध वैज्ञानिक दृष्टिकोन आणि गणिताचे ज्ञान जीवनाच्या विविध क्षेत्रात उपयोगात आणून समाजाची प्रगती साधली जात आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध प्रोजेक्ट्स व मॉडेल पाहता त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दडल्याचे स्पष्ट होत असून हे बालवैज्ञानिक आपल्या देशाचे उद्याचे भविष्य आहे. या बाल वैज्ञानिकांच्या कल्पकतेला व वैज्ञानिक दृष्टीकोण वृद्धिंगत होण्यासाठी गणित विज्ञान प्रदर्शनातून उपलब्ध करून दिलेली संधी कौतुकास्पद असून या माध्यमातून भविष्यात मोठे वैज्ञानिक घडू शकतील असा विश्वास आ. आशुतोष काळे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी चंदूमामा लोखंडे, बाळासाहेब आबक, लक्ष्मणराव साबळे, चंद्रशेखर देशमुख, औद्योगिक वसाहत संचालक पंडितराव भारूड, ग्रामपंचायत सदस्य तुषार बारहाते, अशोक लोहकणे, गटविकास अधिकारी संदीप दळवी, कृषी अधिकारी सचिन कोष्टी, पंडितराव वाघीरे, गट शिक्षणाधिकारी शबाना शेख, सर्व विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीराम मंदिर नवीपेठ येथे श्रीरामलल्ला प्रतिष्ठा व्दादशी सोहळास प्रारंभ

**● नगर । वीरभूमी-**

अयोध्या येथील श्रीरामलल्ला प्राणप्रतिष्ठा वर्षपुर्ती दिनानिमीत्त आज पहिल्या दिवशी श्रीराम जय राम जय जय राम जपाने नवीपेठ येथील श्रीराम मंदिर परिसर दुमदुमतोय.... या जपात भक्तीभावाने भाविक भक्त तल्लीन होत आहेत, श्रीराम जय राम जय जय राम हा जप अखंड २४ तास करण्यात येणार आहे.

श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्यावतीने श्रीरामलल्ला प्राणप्रतिष्ठा व्दादशी सोहळा निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने मंदिरास फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. त्यामुळे मंदिरपरिसरात भक्तीमय वातावरण तयार झाले आहे. सर्वत्र एक मंत्र ऐकू येत आहे... श्रीराम जय राम जय जय राम.... सकाळ पासूनच मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. ट्रस्टच्या सर्व पदाधिकर्यांनी भगवी टोपी आणि कुर्ता परिधान केल्या एक वेगळीच रोनक दिसून येत होती. येणार्या सर्व भाविकांना प्रसाद वाटप होत आहे. अयोध्या येथील श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला एक वर्ष पुर्ण झाले आहे. त्यानिमित्ताने श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळाच्यावतीने हा सोहळा साजरा करण्यात येत आहे. यामध्ये आज सकाळी अखंड २४ तास ।। श्रीराम जय राम जय जय राम ।। या तारक मंत्राचे नामस्मरणरुपी संगीत अनुष्ठान संपन्न होत आहे. दि.०८ जानेवारी रोजी रात्री ८.००वा. भक्तीरंग प्रस्तुत रामायणाचार्य श्री. गोरक्षनाथजी दुतारे महाराज (मुंबई दुरदर्शन कलाकार) यांची श्रीराम भजन सेवा (भजन संध्या) व कार्यक्रमा उपरांत महाप्रसाद., दि. ०९ जानेवारी रोजी रात्री ८.०० वा. प.पु. स्वामी श्री गोविंददेव गुरुजी महाराज यांचे कृपापात्र शिष्य पं. गिरीराजजी व्यास (पुणे निवासी) यांचे सुमधुर वाणीत श्री संगीतमय सुंदरकांड (भक्तीमय संगीत कार्यक्रम) व कार्यक्रमा उपरांत महाप्रसाद., दि. १० जानेवारी रोजी रात्री ८.०० वा. सुप्रसिध्द पं. राजेंद्र शर्मा (रामवाला) - सुप्रसिध्द गायक सी.ए. सागर शर्मा (नागपुर निवासी) प्रस्तुत ।। एक शाम प्रभु श्रीराम के नाम ।। (भजन संध्या) व कार्यक्रमा उपरांत महाप्रसाद., दि.११ जानेवारी रोजी सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० श्रीरामलल्ला प्रतिष्ठा व्दादशी सोहळ्यानिमीत्त सामुहिक महा हनुमान चालिसा पठण व महाआरती दरम्यान सामुहिक भव्य शंखनाद व घंटानाद., सायं. ७ वा. ढोलपथकाचे स्थीर वादन, असे विविध कार्यक्रम होणार आहेत. तरी सर्व कार्यक्रमास शहरवासियांनी जास्तीत जास्त संख्येने सहकुटूंब उपस्थीत राहुन प्रभु श्रीरामांच्या कृपाशिर्वादाचा व दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

## समर्पित शिक्षक व जिज्ञासू विद्यार्थ्यांची परंपरा हेच मॉडर्नचे सामर्थ्य : डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे

**● अकोले । वीरभूमी-**

समर्पित शिक्षक व जिज्ञासू विद्यार्थी ही परंपरा हेच या शाळेचे सामर्थ्य आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रात आपले माजी विद्यार्थी काम करतात त्यांच्यात ती क्षमता या शाळेने निर्माण केली आहे.. तालुक्यात पहिले हायस्कूल असलेल्या या शाळेने वंचितांना शिक्षण देऊन सामाजिक संस्कार केले आहेत. या शाळेची महान परंपरा नव्या पिढीने समजावून घ्यावी अशा भावना प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक अनिल सहस्त्रबुध्दे यांनी व्यक्त केले.

मॉडर्न हायस्कूल व भास्करराव कदम विज्ञान, सोमचंद शहा वाणिज्य व कला महाविद्यालयाच्या ७४ व्या स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष पदावरून ते बोलत होते.

यावेळी शाळेच्या माजी विद्यार्थिनी तथा जलसंपदा विभागाच्या उपसचिव अलका अहिरराव या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. शाळेच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष एस. झेड. देशमुख हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी एस. झेड. देशमुख यांनी शाळेत असतानाच्या विविध आठवणींना उजाळा दिला. जुन्या काळातील शिक्षकांच्या



योगदानाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले. प्रमुख पाहुणे असलेल्या अलका अहिरराव यांनी त्यांच्या शालेय आठवणी सांगून येथील शिक्षणामुळे स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन मंत्रालयात अधिकारी होऊ शकले असे सांगितले.

संपूर्ण शाळा डिजिटल करण्याच्या प्रयत्नाला मदत म्हणून एका वर्गात इंटरक्टिव्ह पॅनल बसवण्यासाठी एक लाखाची देणगी जाहीर केली. यावेळी आजपर्यंत शाळेला इंटरक्टिव्ह पॅनल दिलेल्या तुषार सोनगिरे, दीपक देशमुख, श्रीकांत राठी, राजेश भारंबे, १९८९ व २००० च्या बॅच प्रतिनिधी यांचा सन्मान करण्यात आला. वर्षभर विविध स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना विविध पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माध्यमिक विभागाचे चेअरमन सतीश बूब यांनी केले तर सूत्रसंचलन गणेश जोशी यांनी केले. उपप्राचार्य दीपक जोंधळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी यांनी अहवाल वाचन केले. उपकार्याध्यक्ष व उच्च माध्यमिक विभाग चेअरमन दिलीप शहा यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी ज्ञानवर्धीनी शाळा चेअरमन मोरेश्वर धर्माधिकारी, बालक मंदिर चेअरमन स्मिता मुंदडा, स्कूल कमिटीचे सदस्य, ज्ञानवर्धिनी मुख्याध्यापक रावसाहेब नवले, उपमुख्याध्यापक चित्रा कांबळे, साहित्यिक अण्णा संत व हिंद सेवा मंडळाचे आजीव सदस्य, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, पालक, सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामी समर्थ विद्यालयात विद्यार्थ्यांच्या फूड फेस्टिवलला उत्स्फूर्त प्रतिसाद

### विद्यार्थ्यांनी लावले सुमारे १०० स्टॉल । अवघ्या दोन तासात दीड लाखांची उलाढाल

**● पाथर्डी । वीरभूमी-**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा स्तरावर जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेल्यास विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढण्याबरोबरच व्यावहारिक जगाची ओळख शालेय जीवनातच होते असे मत मुख्याध्यापक एकनाथ ढोले यांनी व्यक्त केले.

शहरातील स्वामी समर्थ विद्यालयात विद्यार्थ्यांनी फूड फेस्टिवलचे आयोजन केले. विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, पेय असे मिळून १०० स्टॉल लावण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी अत्यंत परिश्रम घेऊन पालकांच्या सहकार्याने विविध प्रकारचे पदार्थ करून आणले. उत्स्फूर्त प्रतिसादामुळे अवघ्या दोन तासात सुमारे दीड लाख रुपयांची उलाढाल या फेस्टिवल मध्ये झाली. उद्घाटन सोहळ्यासाठी संस्थेचे अध्यक्ष दिलीप भांडकर, विश्वस्त प्रभाकर इजारे, आनंद चोरडिया, अॅड. विजय वेलदे, ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री आदी उपस्थित होते. तालुका गणित विज्ञान प्रदर्शनामध्ये या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय पाच पारितोषिके पटकावल्याबद्दल विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना ढोले म्हणाले, सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये समाजात व कुटुंबामध्ये विद्यार्थी पालक असा संवाद कमी होत आहे. विद्यार्थ्यांचे भाव विश्व अभ्यासून त्यांना मायेची व आपुलकीची वागणूक मिळाल्यास त्यांचा बौद्धिक व मानसिक विकास झपाट्याने होतो. केवळ शालेय शिक्षणातून अथवा शिक्षकांच्या सहवासातून असा विकास वेगाने साधता येत नाही. मात्र विविध प्रकारची समाज माध्यमे, धावपळीची जीवनशैली व वैयक्तिक कामकाजामध्ये अतिव्यस्तता असल्याने पालकांचा मुलांना सहवास पुरेशा प्रमाणात लाभत नाही. शाळा स्तरावर गेल्या काही वर्षांपासून फूड फेस्टिवलसह विविध प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये पालकांचा सहवास आवर्जून घेतला जातो. विद्यार्थ्यांकडून निवडण्यात येणाऱ्या पदार्थांवरून त्यांची आवड निवड सुद्धा पालकांच्या लक्षात येते. अभ्यासक्रमाच्या चौकटी बाहेर जाऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये सर्वांगीण सकारात्मक बदल घडून यावा, व्यावहारिक जगामध्ये खंबीरपणे वावरण्यास विद्यार्थ्यांची मानसिकता बलशाली व्हावी असा किंचितसा हेतू अशा मेळाव्यातून साधला जाऊन आर्थिक देवाणघेवाणीतून गणित विषयाची गोडी सुद्धा विद्यार्थ्यांना लागते. या विद्यालयातील विद्यार्थी शाळे च्या वेळे व्यतिरिक्त घरी सुद्धा मोबाईल बघत नाहीत. कुठल्याही विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन माहिती घेतल्यास पालकांकडून सुद्धा अशाच प्रकारचा अहवाल दिला जातो. मोबाईलच्या दुष्परिणामांची कल्पना पालकांसह विद्यार्थ्यांना देण्यात येत असल्याने विद्यार्थी वाचनप्रिय व



निरीक्षणासाठी सज्ज होतात. असा उपक्रम सर्व कुटुंबांमधून व्हावा अशी अपेक्षा ढोले यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक बंडू गाडेकर तर आभार कार्यक्रमाचे स्वागत सोनाली सोनवणे, प्रसाद मरकड यांनी मानले.

SPOT NEWS

## ज्ञानदान करून एकमेकांचे ऊर्जास्रोत व्हा : न्या. शेंडे

**● नगर । वीरभूमी–**
क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण कार्य समजून घेताना जोतिराव फुले यांची वैचारिक जडणघडण अगोदर समजून घेतली पाहिजे. शिक्षणाच्या सुविधाच नव्हे तर पोषक वातावरण नसताना देखील त्यांनी सर्वांसाठी शिक्षणाची रुजवात केली. स्वातंत्र्यपूर्वी समानता पाहिजे आणि ती शिक्षणामुळे येऊ शकते ही भावना त्यामागे होती. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आपण शिक्षण घेत आहोत, मात्र त्याचे ज्ञानात रूपांतर करण्याची गरज आहे. कारण अविद्येने किती अनर्थ होतात हे जोतिराव फुले यांनी आधीच सांगून ठेवले आहे. ज्ञानाचा वसा जोतिरावांनी दिला आणि सावित्रीबाईंनी शिक्षण दिले याची जाणीव ठेवून शिक्षणाला नोकरीचे मापदंड लावण्यापेक्षा ज्ञानाची कास धरा. ज्ञानदान करून एकमेकांचे ऊर्जा स्रोत व्हा, असे प्रतिपादन प्रथम जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले. शहरातील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून न्या. अंजू शेंडे बोलत होत्या. महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या खजिनदार अॅड. दीपलक्ष्मी म्हसे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून न्यायाधीश तथा अहमदनगर जिल्हा विधी प्राधिकरणच्या सचिव भाग्यश्री पाटील उपस्थित होत्या. तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष मा. रामचंद्र दरे, विश्वासराव आठरे, जयंत वाघ, कल्पना वायकर, निमाताई काटे, अलका जंगले, राधाकृष्ण आढाव तसेच प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, डॉ. किसन अंबाडे, प्रा. सुषमा दरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. एस. बी. दरे यांनी केले तर प्रा. एस. एम. मोटे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीपाली जगदाळे यांनी केले आणि प्रा. संगीता निंबाळकर यांनी आभार मानले.

## सावित्री ज्योती महोत्सवांतर्गत मोफत महाआरोग्य शिबिर

**● नगर । वीरभूमी–**
गुलमोहर रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात ९ ते १२ जानेवारी दरम्यान सालाबाद प्रमाणे सावित्री ज्योती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये मोफत महाआरोग्य शिबिर घेण्यात येणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष किशोर डागवाले व डॉ. दिलीप जोंधळे यांनी दिली. जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत युवक कल्याण योजनेमार्फत जय युवा अकॅडमी, समर्पण बहुउद्देशीय सामाजिक संस्था, उडान फाउंडेशन, रयत प्रतिष्ठान, प्रगती फाउंडेशन, जीवन आधार प्रतिष्ठान, अहिल्या फाउंडेशन, मुंबादेवी प्रतिष्ठान, समाज परिवर्तन संस्था आदींच्या माध्यमातून जिल्हा रुग्णालय, संपूर्ण सुरक्षा केंद्र, बाळासाहेब देशपांडे रक्तपिढी, अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभाग, आनंद जनरल हॉस्पिटल, इंडो आयरिश हॉस्पिटल, काकासाहेब म्हस्के मेडिकल कॉलेज, यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेज आदींच्या सहयोगातून भव्य रक्तदान शिबिर, रक्ताच्या विविध तपासण्या, स्त्री आरोग्य तपासणी, आयुर्वेद उपचार पद्धतीवर मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. शिबिरासाठी डॉ. भास्कर रणनवरे, डॉ. अनिल बोरगे, डॉ. कल्पना रणनवरे, डॉ. संजीव गडगे, डॉ. प्रमोद पालवे, डॉ. संतोष गिऱ्हे, डॉ. धनाजी बनसोडे, डॉ. तस्लीमा पठाण, डॉ. सतीश लोंढे, डॉ. अनिता लोंढे, डॉ. सतीश राजुरकर आदी विविध वैद्यकीय तज्ञ रुग्णांची तपासणी करणार आहेत.

# उन्हाळ्यात पूर्ण क्षमतेने शेतकऱ्यांना आवर्तन मिळावे

**विवेकभैय्या कोल्हे यांची मागणी । राहाता येथे गोदावरी कालवा सल्लागार समितीची बैठक**

**● कोपरगाव । वीरभूमी –**
चालु पावसाळी हंगामात उशीराने पर्जन्यमान झाल्याने गोदावरी कालवे लाभधारक शेतकऱ्यांना रब्बी व उन्हाळ हंगामाच्या पाण्याच्या आवर्तनात योग्य नियोजन करून देण्यात येणारे आवर्तने पुरेसे क्षमतेने द्यावी म्हणजे त्यामुळे अधिकचे आवर्तन न लागता शेतकऱ्यांच्या पाणीपट्टीत बचत होईल. गोदावरी कालव्यांचे आर्युमान शंभर वर्षापेक्षा जास्त झाले असुन त्याच्या नुतणीकरणासाठी धडक कृती कार्यक्रम हाती घ्यावा अशी मागणी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांनी कालवा सल्लागार बैठकीत बोलतांना केली.



जिल्हा सहकारी बँकेच्या राहाता शाखेतील सभागृहात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या अध्यक्षतेखाली बारमाही गोदावरी कालवे लाभधारक कालवा सल्लागार समितीचे बैठक नुकतीच पार पडली, त्यात विवेकभैय्या कोल्हे बोलत होते. तुटीच्या गोदावरी खोऱ्यात पश्चिमेचे समुद्राला अतिरिक्त वाहुन जाणारे पाणी पुर्वेकडे वळवावे म्हणून माजमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी विधीमंडळात मंजुरी घेतली असुन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत कृष्णा खोऱ्याप्रमाणे कार्यक्रम राबवुन नगर नाशिकसह मराठवाड्याच्या प्रादेशिक पाणीवादात शेतकऱ्यांना न्याय द्यावा असेही ते म्हणांले.

विवेकभैय्या कोल्हे पुढे म्हणाले की, उन्हाळयात तीन आर्वतने दिली तर शेतकऱ्यांना रब्बी हंगामाची ८ हजार ५०० रूपये पाणीपटटीचा उदंड पडतो, तेंव्हा आहे त्या पाण्यांच्या दोन आर्वतनांत बचत करून तिसरे उन्हाळ पाण्यांचे आर्वतन दिल्यास शेतकऱ्यांच्या पाणीपटटीत ३ हजार ५०० रूपयांची बचत होणार आहे, उन्हाळ हंगाम आर्वतनाचा कालावधी वाढवावा. कालवा आर्वतन सोडण्यापुर्वी ज्या चाऱ्या, उपचाऱ्या आहे त्याची दुरूस्ती करावी.

गोदावरी कालवे नुतनीकरणाचा प्रश्न अनेक वर्षापासुन प्रलंबित आहे. उजव्या कालव्यासाठी १९१ कोटींचा निधी मंजुर झाल्याचे समजले मात्र डाव्या कालव्यास अजुन निधीच मंजुर नाही तेंव्हा तो तातडीने उपलब्ध व्हावा.

शेजपाळी पाण्यांचे रजिष्टर अद्यावत ठेवले जावे, आर्वतन काळात नाशिक पाटबंधारे अंतर्गत जलसंपदा खात्याचा कर्मचारी वर्ग अपुरा असल्यांने शेतकऱ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागतो तेंव्हा हा कर्मचारी वर्ग तात्काळ भरला जावा, नांदुर मध्यमेश्वर ते हरिसन ब्रांच व हरिसन ब्रांच ते श्रीरामपुर असे दोन भाग या कालव्यास पडतात तेंव्हा हरिसन ब्रांच ते श्रीरामुपर टेल अशा पध्दतीने पाण्यांचे आर्वतन व्हावे. जेणेकरून हरिसन ब्रांच धारक शेतकऱ्यांच्या अडी अडचणी दुर होतील.

बिगर सिंचन पाण्यांचा भार दारणा गंगापुर धरण कार्यक्षेत्रावर वाढतो आहे त्याचा फटका बारमाही गोदावरी कालवे लाभधारकांना बसत आहे त्यासाठी पश्चिमेचे पाणी पुर्वेकडे आणले जावे असे ते शेवटी म्हणाले.

याप्रसंगी खासदार भाउसाहेब वाकचौरे, मा.आ.सौ.स्नेहलताताई कोल्हे, आ. आशुतोष काळे, आ. हेमंत ओगले, उत्तर महाराष्ट्र प्रदेश जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, अधिक्षक अभियंता राजेश गोवर्धने, नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती सोनल शहाणे, उजव्या तट कालव्याचे उपअभियंता संभाजी पाटील, डाव्या कालव्याचे उपअभियंता संदिप पाटील, विविध सहकारी पाणीवापर संस्थांचे पदाधिकारी, लाभधारक शेतकरी, सहकारी साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजूर येथे नळ जोडणीची तरदूत नसल्याने जलजीवन योजनेचे सुधारीत अंदाजपत्रक नामंजूर

**● अकोले । वीरभूमी–**
येथील पाणीपुरवठा जलजीवन योजनेचे सुधारित पाच कोटीचे अंदाजपत्रकात नवीन नळ जोडणीची तरतूद नसल्याने राजुर ग्रामसभेत सुधारित वाढीव निधी अंदाजपत्रक नामंजूर केले आहे. जोपर्यंत वाढीव अंदाजपत्रकात नळजोडणीसाठी निधीचा समावेश केला जात तोपर्यंत ते मंजूर केले जाणार नाही, असा ठराव ग्रामसभेत घेण्यात आला आहे. तर यावेळी ग्रामपंचायत वार्षिक आराखड्यास मंजुरी देण्यात आली.

ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच पुष्पाताई निगळे या होत्या.राजुर ग्रामपंचायतीचा वार्षिक आराखडा सादर करून त्यास ग्रामसभेची मंजुरी घेण्यासाठी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यास ग्रामसभेने एकमताने मंजुरी दिली. यावेळी उपसरपंच संतोष बनसोडे, माजी उपसरपंच गोकुळ कानकाटे, ग्रामविकास अधिकारी राजेंद्र वर्पे, शेखर वालझाडे, काशिनाथ भडांगे, अतुल पवार, गजानन घाटकर, अविनाश बनसोडे, राजू चोथवे, प्रमोद देशमुख, तुषार मैड आदी मान्यवर व विविध खात्याचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

अनेक वर्षांपासून राजुर पाणीपुरवठा प्रश्न प्रलंबित आहे. वाढीव लोकसंख्या विचारात धरून पुढील पंचवीस वर्षाचे नियोजन करून १० कोटी रुपये मंजूर होऊन जलजीवन योजने अंतर्गत काम प्रगतीपथावर आहे. त्यात वाढीव अंदाजपत्रक तयार करून ते ग्रामसभेपुढे ठेवले असता त्यामध्ये नवीन नळ जोडणीचा समावेश नसल्याने सदर अंदाजपत्रक नामंजूर करण्याचा ठराव माजी उपसरपंच गोकुळ कानकाटे यांनी मांडला तर उपसरपंच संतोष बनसोडे यांनी सदर ठरवास अनुमोदन दिले व नळजोडणीचा नवीन प्रस्तावात समावेश करावा अशी सूचना मांडली.

कॉलेज रोड, दिगंबर रोड याठिकाणी भरणारा आठवडे बाजार विस्तारत चालल्याने राजुरची मूळ व्यापारी बाजारपेठ ओस पडत चालली आहे. यामुळे हा बाजार मुख्यपेठ, नाट्यचौक, बाजारपेठ चौक याठिकाणी भरवावा व तशी व्यवस्था करून द्यावी अशी विनंती व्यापारी गजानन घाटकर, दत्तात्रय चोथवे यांनी केली. त्याबाबत सरपंच निगळे यांनी दोन आठवड्यात तशी व्यवस्था करण्याची ग्वाही दिली. राजुर पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरावस्था झाली असून परिसरातील नागरिक घाण टाकतात त्यामुळे तेथे नागरिकांना याबाबत सूचना करावी अशी मागणी पशुवैद्यकीय अधिकारी जितेंद्र भांगरे यांनी केली. यावेळी कर्मचारी निवासस्थान बांधले तर कर्मचारी तेथेच राहून काम करतील, त्यासाठी ग्रामपंचायतने निधीसाठी पाठपुरावा करावा असे मत अविनाश बनसोडे यांनी व्यक्त केले.

## मढेवडगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्यांच्या आनंदी बाजारात दीड लाखांची उलाढाल

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहार ज्ञानाचे धडे मिळावे. कमवा व शिका ही संकल्पना विद्यार्थ्यांत प्रत्यक्ष रुजावी या संकल्पनेतून मुख्याध्यापक जावेद सय्यद यांनी आनंदी बाजार व बाल आनंद मेळाव्याचे आयोजन मढेवडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत शिक्षक वृंद, पालक व ग्रामस्थांच्या साहाय्याने मंगळवार दि.७ रोजी राबविण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कृतीतून शिक्षण देण्याचे एक महत्त्वपूर्ण काम शिक्षक वर्गाने हाती घेतले होते.



यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. त्याला पालक व ग्रामस्थांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. या आनंद मेळाव्यात व्हेज ते नॉनव्हेज खाद्य पदार्थांबरोबर भेळ, ढोकळा, भजी, वडापाव, साऊथ इंडियन खाद्य तसेच विद्यार्थ्यांनी खेळणी, वाचनीय पुस्तके, चॉकलेट विक्री, महिलांची आभूषणे, भाजीपाला विक्री दुकानांचे स्टॉल लावले होते. यातून विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञान व आत्मविश्वास मिळाल्याचे दिसून येत होते. या मेळाव्यात सुमारे दीड लाख रुपयांची रक्कम विक्रीतून बाल चिमुकल्यांनी जमवली

या मेळाव्याचे सरपंच प्रमोद शिंदे, वसंतराव उंडे, स्मितल वाबळे, राहुल साळवे, राजकुमार उंडे, सोमनाथ फरकांडे, सचिन उंडे, अमोल गाढवे, दीपक गाडे, संग्राम शिंदे, योगेश शिंदे, अभय गुंड, डॉ, अभय शिंदे, देवयानी शिंदे, बबनराव साबळे, यांनी उद्घाटन केले. यावेळी लोणी व्यंकनाथ शाळेचे मुख्याध्यापक श्री.नवले, श्री. दातिर, भावना मोहिते, सौ. सुर्यवंशी, सौ. भापकर, सौ. जगताप, सौ. कोतकर तसेच न्यू इंग्लिश स्कूल मढेवडगाव येथील शिक्षक शिक्षिका व विद्यार्थ्यांनी भेट देऊन खरेदी केली. आनंदी बाजारचे खास आकर्षण ऊर्वी शिंदे या विद्यार्थिनीने लावलेले पुस्तकाचे स्टॉल होते.

मेळावा सुंदर होण्यासाठी मुख्याध्यापक जावेद सय्यद, सौ. शिंदे, सीमा खिळे, सौ. शिर्के, धन्वंतरी बंगाळे, सुवर्णा बारसकर, सुनिता ढवळे, सौ. ससाणे या शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंतराव जाधव यांनी तर आभार शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ फरकांडे यांनी मानले.

# के. जे. सोमय्या व के. बी. रोहमारे महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**● कोपरगाव । वीरभूमी–**
कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे के.जे.सोमय्या (वरिष्ठ) व के.बी.रोहमारे (कनिष्ठ) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या १९६८-६९ ते १९७१-७२ या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा महाविद्यालयाच्या साकरबेन सभागृहात कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोकराव रोहमारे यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटी सचिव संजीव कुलकर्णी, कार्यकारी विश्वस्त संदीप रोहमारे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुधीर डागा, या बॅचचे शिक्षक सुधाकर गणोरकर, एन. एम. जोशी, अविनाश घैसास आदींच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

१९६८-६९ ते १९७१-७२ या बॅचचे विद्यार्थी ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे म्हणाले की, या महाविद्यालयातील शिक्षकांनी शिकविलेल्या डेबिट क्रेडिट मुळे व्यवसाय करण्याकरिता प्रोत्साहन मिळाले. माजी विद्यार्थ्यांना नेहमी सहकार्य व पाठीशी उभे राहणारे हे महाविद्यालय आहे.अशोकराव रोहमारे यांनी के. जे.सोमय्या (वरिष्ठ) व के.बी.रोहमारे (कनिष्ठ) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा पाया घातला. त्यांचे चिरंजीव संदीप रोहमारे यांनी अतिशय उत्तम प्रकारे त्यावर कळस चढविला आहे. अशोकराव रोहमारे यांचे मॅनेजमेंट उत्कृष्ट असून या महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती कौतुकास्पद आहे. माजी विद्यार्थ्यांच्या यशाची परंपरा या महाविद्यालयाला लाभली आहे.

माजी विद्यार्थी नारायण क्षीरसागर, अश्विन कुमार व्यास, पद्मा कोटस्थाने, शिक्षक सुधाकर गणोरकर, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुधीर डागा आदींच्या मनोगतातून ५४ वर्षानंतर एकत्र आल्याने भावनांचा महापुर ओसंडत होता. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. तसेच समता पतसंस्थेचे चेअरमन काका कोयटे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुधीर डागा, आशुतोष पटवर्धन, शब्बीर पठाण, श्रीकांत बागुल, सुधीर गवांदे आदींनी महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधिकाधिक उंचविण्यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य विजय ठाणगे यांच्याकडे आर्थिक स्वरूपात देणगी देण्यात आली. तसेच माजी विद्यार्थ्यांच्यावतीने महाविद्यालयाला एकत्रितरीत्या देणगी दिली गेली. महाविद्यालयाचे कार्यकारी विश्वस्त संदीप रोहमारे यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील सर्व विभागांची माहिती देत शैक्षणिक प्रगतीचा आलेख सादर केला असता माजी विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



प्रसंगी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुधीर डागा म्हणाले की, विद्यार्थी हा शेवटच्या क्षणापर्यंत विद्यार्थीच असतो. त्याचे शरीर थकत असते पण त्याचे मन कधीही थकू शकत नाही. त्याच्यात सतत काही ना काही शिकण्याची धडपड चालू असते. महाविद्यालयाच्या भव्य इमारती आणि त्या इमारतींमधून दिले जाणारे ज्ञान हे आमच्यासाठी आणि पुढील पिढीसाठी देखील अमृत आहे.

अध्यक्ष अशोकराव रोहमारे म्हणाले की, या महाविद्यालयाच्या वरिष्ठ व कनिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान शाखांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात आहे. सौ.सुहासिनी कोयटे यांच्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात महाविद्यालयाच्या भागात पाण्याची टाकी बांधून महाविद्यालयाला पाण्याची येणारी अडचण सोडविली होती. त्यामुळे कोयटे परिवाराच्या सेवाभावी सहकार्यामुळे अनेक प्रश्न सुटत आलेले आहे. तसेच तालुक्यातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून देखील अनेक समस्या सोडविण्यात आल्या आहेत.

या स्नेह मेळाव्याचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य विजय ठाणगे यांनी केले. स्नेह मेळावा यशस्वीतेसाठी या बॅचचे बाबासाहेब मांडवडे व नारायण क्षीरसागर यांनी विशेष परिश्रम घेतले. दिलीप परदेशी, विजय देशपांडे, अशोक लोंगाणी आदींसह माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रा.शैलेश बनसोडे यांनी केले. उपस्थितांचे आभार कार्यालयीन अधीक्षक अभिजीत नाईकवाडे यांनी मानले.

वीरभूमी

# विरोधकांना आता टीका करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही

## आ. मोनिका राजळे यांचे प्रत्युत्तर । पाथर्डी पालिका कार्यालयात पत्रकार परिषद

● **पाथर्डी । वीरभूमी–**

शहराची उपनगरासह विस्तारीकरण होत आहे. चांगल्या सुविधांसह स्मार्ट सिटीकडे वाटचाल करायची असेल तर रस्ते, गटार, पाणी योजना, विद्युत योजना शहरांमध्ये राबवावी लागेल. यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्टा करून शेकडो कोटी रुपयांचा निधी मिळवत आहोत. मात्र विरोधकांना यातही भूमिपूजनाच्या निमंत्रणावरून राजकारण करायचं असल्याने त्यांना टीका करण्याशिवाय आता दुसरा पर्याय नाही, असे प्रत्युत्तर आमदार मोनिका राजळे यांनी दिले.

मागील चार दिवसापूर्वी खासदार निलेश लंके यांच्या अध्यक्षतेखाली व प्रताप ढाकणे यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी लंके ढाकणे राष्ट्रवादीच्या काही पदाधिकाऱ्यांनी शहरात सुरू असलेल्या विकास कामासंदर्भात काही प्रश्न उपस्थित करून लोकप्रतिनिधी व प्रशासनावर आरोप केले होते. या आरोपांना उत्तर देण्यासाठी नगरपालिकेच्या सभागृहात आमदार मोनिका राजळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पत्रकार परिषद संपन्न झाली. यावेळी मुख्याधिकारी संतोष लांडगे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, डॉ. मृत्युंजय गर्जे, नंदकुमार शेळके, रामनाथ बंग, रमेश गोरे, नामदेव लबडे, बजरंग घोडके, प्रवीण राजगुरू, प्रसाद आव्हाड, अनिल बोरुडे यासह विविध विभागाचे कर्मचारी, पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्याधिकारी लांडगे यांनी शहरात सुरू असलेल्या २२४ कोटी रुपयाच्या भुमिगत गटार योजनेची तांत्रिक माहिती दिली. पुढे बोलताना



आमदार राजळे म्हणाल्या की, वाढत्या शहरीकरणांनुसार शहर विकासाचा आराखडा आपण तयार केला आहे. याप्रमाणे नागरिकांना विविध प्रकारच्या सुविधा मिळाव्यात यासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. विशेष कामासाठी वरिष्ठ स्तरावरून निधी मिळवणे सोपी बाब नसते. तसेच निविदा देखील ऑनलाइन प्रकारे प्रसिद्ध होत आहे. यामुळे यात देखील कोणाचीही शिफारस केली जात नाही. विरोधकांना आरोप करण्याशिवाय आता कुठलेही काम राहिलेले नाही. तरी विरोधक करीत असलेल्या दिशाभुलीला जनतेने बळी पडू नये व शहर परिसरात होत असलेल्या विविध विकास कामांना सहकार्य करण्याचे आवाहन आमदार राजळे यांनी केले.

### प्रशासकीय इमारतीचे भव्य-दिव्य उद्‌घाटन होणार

■ क वर्ग नगरपरिषदेची राज्यात सर्वाधिक मोठी प्रशासकीय इमारत पाथर्डी नगरपरिषदेची आहे. या इमारतीला साजेसे उद्घाटन सोहळा भव्य दिव्य प्रमाणात होईल, असे आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले.

### पत्रकारांच्या सन्मानात प्रशासनाकडून ढिसाळपणा

■ पत्रकार दिनाच्या दिवशीच आयोजित या पत्रकार परिषदेत पत्रकार बांधवांच्या सन्मानाचे नियोजन मात्र पालिका प्रशासनाकडून ढिसाळ झाल्याने उपस्थित पत्रकार बांधवांमध्ये नाराजी व चर्चा होती.

# ॲड. मनोहरराव देशमुख यांच्या जीवन कार्याचा आढावा घेणाऱ्या 'कृतार्थ' या ग्रंथाचे शनिवारी प्रकाशन

● **अकोले । वीरभूमी–**

सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहरराव नानासाहेब देशमुख यांच्या जीवनकार्याचा वेध घेणाऱ्या 'कृतार्थ' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ रोजी राजूर येथील ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयात संपन्न होत आहे. आमदार डॉ. किरण लहामटे, मुंबई येथील शिक्षणतज्ज्ञ, उद्योजक महेश राघू शेट्टी तसेच शिक्षणतज्ज्ञ व उद्योजक डॉ. श्रेणीक कोटेचा यांच्या शुभहस्ते ग्रंथाचे प्रकाशन होणार असून ज्येष्ठ विचारवंत, वक्ते एस. झेड. देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. यावेळी माजी आमदार वैभवराव पिचड व डॉ. सुधीर तांबे, सत्यनिकेतन संस्थेचे कोषाध्यक्ष विवेक मदन, सचिव एम. एल. मुठे, अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, जिल्हा बँकेचे संचालक अमित भांगरे, अगस्ति देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष के. डी. धुमाळ, सामाजिक कार्यकर्ते सुरेश कोते यांचेसह सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष असणाऱ्या ॲड. देशमुख यांचे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण असे योगदान आहे. प्रेम, ज्ञान आणि बळ या तिन्ही गोष्टी ज्यांच्याजवळ आहे, त्याला जगात कृतार्थ होता येईल, असे व्यक्तिमत्त्व ॲड. मनोहरराव नानासाहेब देशमुख यांचे आहे. निष्णात कायदे पंडित, आरोग्य साधनेवर भर देणारे योगसाधक, ग्रामीण व आदिवासी भागाच्या उन्नतीसाठी झटणारे विधायक वृत्तीचे कार्यकर्ते, तत्त्वनिष्ठ शिक्षणप्रेमी व जनसेवेतच ईश्वरसेवा अनुभवणारे पारमार्थिक आणि अनेकविध संस्थांचे संगोपन अशा अनेक नात्यांनी ग्रामीण व आदिवासी भागांपासून मुंबईसारख्या अफाट नगरीपर्यंत ॲड. मनोहरराव देशमुख यांनी जिव्हाळ्याचे नाते जोडले आहे. राजूर येथील ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयाच्या उभारणीत त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन आजपर्यंत विविध संस्थांच्या वतीने त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. सामाजिक कार्याचा वसा घेणाऱ्या एका विधी तज्ज्ञाचा पट मांडणारा कृतार्थ हा ग्रंथ आहे.

ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. द. के. गंधारे यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. या ग्रंथात ॲड. एम. एन. देशमुख यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेणारे मान्यवरांनी तसेच त्यांच्या आप्तस्वकीयांनी लिहिलेले लेख समाविष्ट आहेत. अकोले येथील प्रख्यात चित्रकार मिनानाथ खराटे यांनी या ग्रंथाचे मुखपृष्ठ तयार केले आहे.

या ग्रंथ प्रकाशन सोहळ्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रण समितीच्या वतीने समितीचे प्रमुख माजी प्राचार्य विलास नवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख, संस्थेचे संचालक प्रकाश टाकळकर, प्राचार्य बादशहा ताजणे, संपादक डॉ. द. के. गंधारे, प्रकाशक दीपक पाचपुते, पत्रकार प्रकाश महाले आदींनी केले आहे.

# मोहटादेवी देवस्थानात शाकंभरी नवरात्रोत्सवास प्रारंभ

● **पाथर्डी । वीरभूमी –**

भक्तांच्या कल्याणासाठी व रक्षणासाठी शाकंभरी देवीने पालेभाज्या फळे रानभाज्यांची निर्मिती केली शेकडो वर्षाच्या दुष्काळाने त्रस्त लोकांचे प्राण वाचविले. आदिमाया आदिशक्ती पार्वती मातेचा अवतार शाकंभरी देवी असून सदैव रक्षण करती देवी म्हणून देवी महात्म्य ग्रंथात वर्णन केले आहे. मोहटादेवी देवस्थानात आज शाकंभरी नवरात्रोत्सवास प्रारंभ झाला पहाटे देवस्थान समितीचे विश्वस्त डॉ. श्रीधर देशमुख डॉ. ज्योती देशमुख, बाळासाहेब दहिफळे यांच्या हस्ते देवीची महापूजा अभिषेक संपन्न होऊन नवरात्रोत्सवास प्रारंभ झाला.



शारदीय, वासंतीक व शाकंभरी असे तीन नवरात्र मोहटा देवस्थानात दरवर्षी साजरी होतात सप्तशती पाठ, पुण्य हवन श्री सूक्त लक्ष्मी, सूक्त अथर्वशीर्ष पठणाने पूजा विधी संपन्न झाला. बीडचे उद्योजक दिलीप लोढा, नगरचे उद्योजक दत्तात्रय आवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, मुख्य सेवेकरी अंकुश ठोंबरे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे आदीसह सर्व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. धार्मिक विधीचे पौराहित्य मुख्य पुरोहित भूषण साखरे, बाळासाहेब क्षिरसागर व भास्कर देशपांडे यांनी केले. येत्या रविवार पर्यंत दररोज सप्तशती ग्रंथाचे अनुष्ठान विशेष पूजन होईल. ६४ योगिनी, दशमहाविद्या, अष्टभैरव आदींचे विशेष पूजन आज संपन्न झाले. नवरात्र काळात ६४ योगीनी व दशमहाविद्यांचे दर्शन विशेष पुण्यप्रद मानले गेल्याने भाविकांनी गर्दी केली. सोमवारी १३ जानेवारी रोजी शाकंभरी पौर्णिमेला उत्सवाची सांगता होईल.

या दिवशी सकाळी होम हवन, सर्व देवी देवता, योगिनी व भैरव पूजन, ग्रहयज्ञ, सप्तशतिपाठ, हवन, सुवासिनी व कुमारीका पूजन पूर्णाहुती व महाप्रसादाने नवरात्र उत्सवाचे सांगता होईल. धनधान्य, समृद्धी, आरोग्य व जीवनोध्दारासाठी शाकंभरी देवीची पूजा महत्त्वाची मानली जाते. पौष महिन्यातील शुद्ध अष्टमी पासून सुरू होणारा उत्सव पौष पौर्णिमेपर्यंत चालतो. यंदा सोमवारची पौर्णिमा असून महादेवाचा वार व पार्वती स्वरूप शाकंभरी ची पूजा महाफलदायक ठरून मंगळवारी मकर संक्रातीचा पर्वकाळ असल्याने दोन्ही दिवशी समस्त देवी परिवाराचे श्रद्धायुक्त मनाने दर्शन केलेले कार्य अति पुण्य प्रदान करणारे ठरते. भाविकांची या काळात वाढणारी गर्दी पाहता देवस्थान समितीने सर्व प्रकारचे नियोजन पूर्ण केले आहे.

# इंटरनेटचे व्यसनामुळे मुलांमध्ये आत्ममग्नता वाढत आहे

## पत्रकार मुक्ता चैतन्य । अकोले तालुका पत्रकार संघ व विविध पत्रकार संघटनाच्यावतीने पत्रकार दिनानिमित्त व्याख्यान

● **अकोले । वीरभूमी –**

लहान मुलांचा 'स्क्रीन टाईम' कमालीचा वाढल्यामुळे त्यांचा मेंदू दिवसेंदिवस आकुंचित होत असल्याचे संशोधनात दिसून आले आहे. त्यामुळे त्यांच्या ठायी असलेली आकलन आणि भाषा शिक्षणाची मूलभूत क्षमता नष्ट होत आहे. इंटरनेटचे व्यसन जडलेल्या मुलांमध्ये आत्ममग्नता (व्हर्च्युअल ऑटिझमचे रुग्ण) वाढत आहेत. समाज म्हणून आगामी काळात याची मोठी किंमत मोजायला लागणार आहे, असा सावधगिरीचा इशारा समाज माध्यमांच्या अभ्यासक, पत्रकार मुक्ता चैतन्य यांनी दिला.

अकोले तालुका पत्रकार संघ व तालुक्यातील विविध पत्रकार संघटनांच्या वतीने पत्रकार दिनाच्या निमित्ताने अकोले पंचायत समिती सभागृह येथे पत्रकार मुक्ता चैतन्य यांचे 'आजच्या डिजिटल मीडियातील आव्हाने' या विषयावर व्याख्यानात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अकोले तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल वैद्य होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आमदार डॉ. किरण लहामटे हे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी मुक्ता चैतन्य म्हणाल्या की, डिजिटल जगात तुम्ही पत्रकार असो की नसो, इतर कुठल्याही व्यवसायात असो, नुसते युजर असा सर्क्युलर रिपोर्टींगमध्ये अनेकांचा कळत नकळत सहभाग असतो. आणि त्यातून अनेक प्रश्न तयार होत आहेत. एखादी खोटी, अर्धसत्य माहिती सर्क्युलर रिपोर्टींगमुळे खरी असल्याचा आभास निर्माण होतो. त्या आभासी असत्याच्या आधारावर माणसं स्वतःची मतं बनवण्यापासून निरनिराळ्या प्रसंगात निर्णय घेण्यापर्यंत अनेक गोष्टी करत आहेत. माध्यमांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींनी तर यापासून दूर राहिलंच पाहिजे पण प्रत्येक युजरनेही आपण याचा कळत नकळत भाग होत नाही ना हे तपासणं गरजेचं असल्याचे त्यांनी सांगितले.

इंटरनेटचे जडलेले व्यसन, सुरक्षित नसलेला नागरिकांचा डेटा, वाढत चाललेले सायबर गुन्हे आणि विश्वासार्हता आणि अधिकृत स्त्रोत माहिती नसताना सोशल नेटवर्किंग साईट्समधून (सर्क्युलर जर्नालिझमच्या माध्यमातून) पसरवली जाणारी खोटी माहिती ही आजच्या डिजिटल काळातील मोठी आव्हाने आहेत. मोबाइलसारखी गॅझेट्स वापरणारे लोक केवळ तंत्रशिक्षित आहेत. डिजिटल काळात माध्यम शिक्षित समाजाची नितांत गरज आहे. दुर्दैवाने आपल्या समाजात माध्यम शिक्षण कमालीचे दुर्लक्षित आहे. त्याविषयी मांडणी करत असतानाच 'सर्क्युलर रिपोर्टींग किंवा सर्क्युलर पत्रकारिता' या अतिशय महत्वाच्या आणि दुर्लक्षित विषयाची त्यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली.

आमदार डॉ.किरण लहामटे यांनी समाजकारण, राजकारणातील वाईट प्रवृत्तींवर घाव घालण्याची ताकद पत्रकारितेत आहे, समाजा पुढील प्रश्न पत्रकारांनी ताकदीने उचलले पाहिजेत असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल वैद्य यांनी तालुक्यातील पत्रकारितेच्या वाटचालीचा आढावा घेतला. याप्रसंगी ज्येष्ठ नेते कॉ. कारभारी उगले, विजयराव वाकचौरे, इंजि.सुनिल दातीर, सुधाकरराव देशमुख, ॲड. के. बी. हांडे, डॉ. मनोज मोरे, ॲड. वसंतराव मनकर, बी. जे. देशमुख,



प्राचार्य हेरंब कुलकर्णी, विनय सावंत, कैलासराव शेळके, संदीपराव शेटे, खंडू वाकचौरे, हभप. दिपक महाराज देशमुख, बाळासाहेब भोर, डॉ.साहेबराव वैद्य, शिवाजी आरज, हेमंत दराडे, सचिन शेटे, अमोल देशमुख, संदीप शेणकर, सुभाष येवले, मच्छिंद्र मंडलिक, डॉ. बी. वाय. देशमुख, प्रा. चांगदेव डोंगरे, प्रा. विजय भगत, प्रा. किरण जाधव, डॉ. सुनील मोहटे, डॉ. द. के.गंधारे, प्राचार्य बादशहा ताजने, घनश्याम माने, डॉ. सुशील बेनके, डॉ. सय्यद, हेमंत मोरे, संजय हासे, पोपट फरगडे, प्रकाश हासे, दिपक राऊत, साहित्यिक राजेंद्र भाग्यवंत, भाऊसाहेब कासार, दिपक पाचपुते, विलास वाकचौरे, राजेंद्र भोर, के. के. डावरे, पत्रकार भाऊसाहेब मंडलिक, प्रकाश टाकळकर, विद्याचंद्र सातपुते, गणेश आवारी, अमोल पवार, नरेंद्र देशमुख, विलास तुपे, आबासाहेब मंडलिक, भाऊसाहेब वाकचौरे, हर्षदीप डावरे, राजू मालुंजकर, दिनेश जोरवर, अक्षय आभाळे, मुकुंद लहामटे, सचिन मंडलिक, हरीश कुसळकर, डॉ. रमा कुलकर्णी, सौ. सुशीला बापट, प्रा. डॉ. महेजबिन सय्यद, प्रतिमा कुलकर्णी, नीलिमा देशमुख, प्रा. डॉ. रंजना कदम, मीनल चासकर, शीतल वैद्य, आशा आभाळे, स्नेहल राऊत, सौ.ललिता बेनके आदी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक व स्वागत पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष श्रीनिवास रेणूकदास यांनी केले. पाहुण्यांचा परिचय शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब चासकर यांनी करून दिला. अध्यक्षीय सूचना प्रकाश महाले यांनी मांडली. त्यास नंदकुमार मंडलिक यांनी अनुमोदन दिले. सूत्रसंचालन पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष प्रकाश आरोटे व सचिव चंद्रशेखर हासे यांनी केले. तर भाऊसाहेब वाकचौरे यांनी आभार मानले.